DAY — **13** SEAT NUMBER | | | | | | | |

2026	II	26	1100	**J-197**	(M)

BOOK KEEPING & ACCOUNTANCY (50)

Time : 3 Hrs. **(12 Pages)** **Max. Marks : 80**

प्र. १. खालील सर्व उपप्रश्न सोडवा : **[२०]**

(अ) कोष्टक पूर्ण करा : (५)

(१) विक्रीत मालाचे मूल्य = प्रारंभण स्कंध + खरेदी — ☐

(२)	उत्पन्न	खर्च	तूट
	२५,०००	☐	२,०००
(३)	विपत्राची तारीख	मुदत	देय दिनांक
	२३.१२.२०२१	१ महिना	☐
(४)	धनको	देय-विपत्र	बाह्य देयता
	४०,०००	६०,०००	☐
(५)	विक्री	खरेदी	ढोबळ नफा
	☐	१,८०,०००	२०,०००

(ब) योग्य पर्यायाची निवड करून वाक्य पुन्हा लिहा : (५)

(१) भागीदाराच्या निवृत्तीच्या वेळी पुनर्मूल्यांकनावर झालेला नफा किंवा तोटा ——— विभागून घेतला जातो.

(अ) उरलेल्या भागीदारांमध्ये (ब) सर्व भागीदारांमध्ये

(क) फक्त निवृत्त भागीदार (ड) बँक

(२) नफा-तोटा निलंबित खाते हे नवीन ताळेबंदात ——— बाजूला दाखवितात.

(अ) नावे

(ब) जमा

(क) संपत्ती

(ड) देयता

(३) नफा न कमविणाऱ्या संस्थांना ——— संस्था असे देखील म्हटले जाते.

(अ) सेवा (ब) व्यापारीक

(क) नफा कमविणारी (ड) वाणिज्यिक

(४) ——— ही अदृश्य संपत्ती आहे.

(अ) स्कंध (ब) उपस्कर

(क) रोख (ड) ख्याती

(५) जेव्हा व्यवसायात अनोंदीत संपत्ती आणली जाते तेव्हा ——— खाते जमा होते.

(अ) पुनर्मूल्यांकन (ब) ताळेबंद

(क) भागीदारांचे भांडवल (ड) व्यापार

(क) खालील विधानांसाठी प्रत्येकी एक योग्य शब्द / संज्ञा / शब्द समूह लिहा : (५)

(१) पुनर्मूल्यांकन खात्याची नावे बाकी.

(२) भेदन केलेली प्रणाली जी थोड्या प्रमाणात खराब झालेली आहे, परंतु कार्यान्वित आहे.

(३) सरासरी नफा – सामान्य नफा =

(४) नफा न कमविणाऱ्या संस्थेचे असे खाते ज्यामध्ये केवळ महसुली पदांचीच (revenue items) नोंद करण्यात येते.

(५) भागीदारांमधील लिखित असलेला करार.

SEAT NUMBER | | | | | | | |

(ड) खालील वाक्य पूर्ण करा : (५)

(१) ₹ १०० दर्शनी मूल्याच्या भागाचे ₹ ११० या मूल्यावर निर्गमन केले असता त्याला ——— भागांचे निर्गमन असे म्हणतात.

(२) जो व्यक्ती विपत्र काढतो त्यास ——— म्हणतात.

(३) विसर्जन खर्च हा ——— खात्याला जमा केला जातो.

(४) प्राप्ती शोधन खात्याचे जमा बाजूवर रोख ——— दर्शविले जाते.

(५) देय तिथी पूर्वीच्या केलेल्या खर्चास ——— म्हणतात.

प्र. २. मोहित आणि रोहित समप्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांचा ताळेबंद खालील प्रमाणे आहे : **[१०]**

ताळेबंद ३१ मार्च, २०२१ रोजीचा

देयता		रक्कम (₹)	संपत्ती	रक्कम (₹)
देय विपत्र		५२,०००	रोकड	१,६०,०००
धनको		४८,०००	स्कंध	८०,०००
भांडवल खाते :			यंत्र व संयंत्र	१,४०,०००
मोहित	२,००,०००		ऋणको	५२,०००
रोहित	२,८०,०००	४,८०,०००	उपस्कर	४८,०००
सामान्य संचिती		२०,०००	जमीन व इमारत	१,२०,०००
		६,००,०००		**६,००,०००**

१ एप्रिल २०२१ रोजी सुजीतला भविष्यातील नफ्यामध्ये १/५ हिश्श्यासाठी भागीदारीत प्रवेश देण्यात आला. तेव्हा प्रवेशाच्या अटी खालील प्रमाणे होत्या :

(१) स्कंध आणि यंत्र व संयंत्राचे मूल्य २०% कमी करावे.

(२) जमीन आणि इमारतीचे मूल्य ₹ १,७५,००० करावे.

(३) ऋणकोंवर १०% तरतूद करावी.

(४) सुजीतने भांडवल म्हणून ₹ २,००,००० आणावे.

(५) ख्यातीचे मूल्य ₹ ४,००,००० करण्यात आले. सुजीतने त्याचा हिस्सा रोख आणावयाचा आहे.

वरील योजना कार्यान्वित करण्यासाठी भागीदारीच्या पुस्तकात किर्दनोंदी करून नफा-तोटा समायोजन खाते तयार करा.

किंवा

दौलतच्या पुस्तकात खालील व्यवहाराच्या किर्दनोंदी द्या :

(१) सरिताने स्वीकारलेले ₹ २०,००० चे ३ महिने मुदतीचे विपत्र बँकेत ₹ १९,८०० ला वटविले.

(२) सिद्धीने स्वीकारलेले ₹ १५,००० चे विपत्र देय दिनांकाच्या १ महिना आधी वार्षिक १२% कसरीवर निवर्तन झाले.

(३) प्रचितीने स्वीकारलेले ₹ ९,७५० चे विपत्र भूमिकाला ₹ १०,००० च्या पूर्ण लेखा शोधनार्थ पृष्ठांकित केले.

(४) मधुराला १०% व्यापारी कसरीवर ₹ २०,००० च्या वस्तू विकल्या. अर्धी रक्कम लगेच मिळाली आणि शेष रकमेसाठी नवीन २ महिने मुदतीच्या विपत्राला मधुराने स्वीकृती दिली. देय दिनांकाला मधुराने विपत्राचे शोधन केले.

SEAT NUMBER | | | | | | | |

प्र. ३. राजीव, संजीव आणि महेश हे जानकी ट्रेडर्सचे भागीदार असून २ : २ : १ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेतात. त्यांचा भागीदारीचा ३१ मार्च, २०२२ रोजीचा ताळेबंद पुढील प्रमाणे आहे : **[१०]**

ताळेबंद ३१ मार्च, २०२२ रोजीचा

देयता	रक्कम (₹)	संपत्ती		रक्कम (₹)
भांडवल खाते :		यंत्र		२,००,०००
राजीव	२,४०,०००	गुंतवणूक		९६,०००
संजीव	८०,०००	ऋणको	२,२०,०००	
महेश	८०,०००	बुडीत कर्जनिधी	१२,०००	२,०८,०००
सामान्य निधी	२४,०००	स्कंध		८०,०००
धनको	१,६०,०००	बँक		५६,०००
देय विपत्र	५६,०००			
	६,४०,०००			**६,४०,०००**

वरील तारखेला भागीदारांनी संस्था विसर्जित करण्याचे ठरविले.

(१) संपत्तीचे रोखीकरण :

यंत्र ₹ १,८०,०००, स्कंध ₹ ७२,०००, गुंतवणूक ₹ ८४,००० आणि ऋणको ₹ १,८०,०००.

(२) विसर्जन खर्च : ₹ १२,०००

(३) संस्थेच्या ख्यातीचे रोखीकरण : ₹ ९६,०००

भागीदारी संस्थेची हिशोबाची पुस्तके बंद करण्यासाठी आवश्यक खाती तयार करा.

किंवा

रमेश, दिनेश आणि महेश हे भागीदार असून ते ५ : २ : ३ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेतात. त्यांचा ३१ मार्च, २०२० रोजी ताळेबंद खालील प्रमाणे होता :

ताळेबंद

३१ मार्च, २०२० रोजीचा

देयता	रक्कम (₹)	संपत्ती		रक्कम (₹)
भांडवल खाते :		यंत्र और संयंत्र		४२,०००
रमेश	४६,०००	इमारत		५०,०००
दिनेश	४२,०००	स्कंध		३०,४००
महेश	२७,६००	ऋणको	२६,८००	
धनको	३०,०००	(–) संशयित		
देय विपत्र	११,२००	कर्ज निधी	८००	२६,०००
राखीव निधी	२४,०००	बँक		३२,४००
	१,८०,८००			**१,८०,८००**

१ एप्रिल, २०२० ला दिनेश व्यवसायातून खालील अटींवर निवृत्त झाला :

(१) संपत्तीचे पुनर्मूल्यांकन खालील प्रमाणे केले होते :

(अ) स्कंध ₹ ३८,०००

(ब) इमारतीचे मूल्य १०% ने वाढवावे.

(क) यंत्र और संयंत्रावर १०% दराने घसारा आकारा.

(ड) ऋणकोंवरील संशयित कर्ज निधी ₹ १,००० पर्यंत वाढवा.

(२) निवृत्त होणाऱ्या भागीदाराच्या हिश्श्याच्या ख्यातीचे मूल्य ₹ १८,०००लावावे आणि उरलेल्या भागीदारांनी असे ठरविले की ख्यातीचे अपलेखन त्यांच्या नवीन लाभ विभाजनाच्या प्रमाणात करावे, लाभ विभाजनाचे नवीन प्रमाण ५ : ३ आहे.

(३) दिनेश यास निवृत्तीच्या वेळी द्यावयाची राशी त्याच्या कर्ज खात्याला स्थानांतरित करावी.

तयार करा :

(अ) पुनर्मूल्यांकन खाते

(ब) भागीदारांचे भांडवल खाते

(क) नवीन संस्थेचा ताळेबंद

प्र. ४. महेंद्र, जितेंद्र आणि हितेंद्र हे भागीदार असून ते अनुक्रमाने ३:२:१ या प्रमाणात नफा–तोटा विभागून घेणारे भागीदार आहेत. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च, २०२२ रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे होता : **[८]**

ताळेबंद ३१ मार्च, २०२२ रोजीचा

देयता	रक्कम (₹)	संपत्ती	रक्कम (₹)
भांडवल खाते :		ऋणको	९०,०००
महेन्द्र	२,२०,०००	यंत्र	८५,०००
जितेन्द्र	२,१०,०००	गुंतवणूक	३,५०,०००
हितेन्द्र	२,४०,०००	मोटर ट्रक	१,००,०००
धनको	८०,०००	इमारत	८०,०००
देय विपत्र	७,०००	बँक	१,४८,०००
सामान्य निधी	९६,०००		
	८,५३,०००		**८,५३,०००**

दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ रोजी हितेंद्रचा मृत्यू झाला. भागीदारीच्या कराराप्रमाणे खालील समायोजन करण्यात आले :

(१) यंत्र आणि धनको यांचे मूल्यांकन अनुक्रमे ₹ ८०,००० आणि ₹ ६९,००० करण्यात आले.

(२) २०२२–२०२३ या वर्षाचा अनुमानित नफा ₹ १,२०,००० आहे. या नफ्यातूनच हितेंद्रचा, त्याच्या मृत्यूपर्यंतचा, नफा देण्यात यावा.

(३) ख्यातीचे मूल्यांकन मागील पाच वर्षाच्या सरासरी नफ्याच्या दोन पट लावण्यात यावे. संस्थेचा मागील पाच वर्षांचा नफा पुढील प्रमाणे आहे :

I	वर्ष	₹ १,८०,०००
II	वर्ष	₹ १,५०,०००
III	वर्ष	₹ २,००,०००
IV	वर्ष	₹ १,२०,०००
V	वर्ष	₹ २,५०,०००

हितेंद्रचा नफ्यातील हिस्सा त्याला देण्यात यावा.

(४) हितेंद्रने त्याच्या मृत्यू दिनांका पर्यंत ₹ ३०,००० उचल केलेली आहे.

(५) हितेंद्रच्या उचलीवर ₹ २,००० व्याज आकारावयाचे आहे.

हितेंद्रचे भांडवल खाते तयार करा आणि :

(१) हितेंद्रचा ख्यातीमधील हिस्सा

(२) हितेंद्रचा नफ्यातील हिस्सा यांच्या नफा आगणनाचे कृती कार्य दाखवा.

किंवा

संगणकीय लेखांकन प्रणालीचे (Computerised Accounting System) महत्त्व स्पष्ट करा.

प्र. ५. पवित्रा कंपनी लिमिटेडने ₹ २०,००,००० चे नवीन भाग भांडवल जे प्रत्येकी ₹ १०० च्या प्रति भागात विभाजित असेलेले प्रति भाग ₹ २० प्रव्याजीवर निर्गमित केले (विक्रीस काढले) **[८]**

भागावर देय राशी पुढील प्रमाणे :

अर्जा सोबत	₹ २०
आवंटनावर (वाटपावर)	₹ ४० (₹ १० प्रव्याजीसह)
प्रथम आणि अंतिम याचना (अंतिम हप्ता मागणी)	₹ ६० (₹ १० प्रव्याजीसह)

जनतेकडून भागांकरिता अर्ज आले आणि सर्व अर्जदारांना भागांचे वाटप करण्यात आले. आवंटन आणि मागणीची सर्व रक्कम मिळाली.

पवित्रा कंपनी लिमिटेडच्या पुस्तकात रोजकीर्द नोंद करा.

किंवा

SEAT NUMBER | | | | | | | |

व्यापार आणि नफा-तोटा खाते

३१ मार्च, २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता

नावे **जमा**

तपशील	रक्कम (₹)	तपशील	रक्कम (₹)
प्रारंभण स्कंध	४,००,०००	विक्री	२४,००,०००
खरेदी	१८,००,०००	संवरण स्कंध	६,००,०००
मजुरी	२,००,०००		
ढोबळ नफा (खाली नेला)	६,००,०००		
	३०,००,०००		**३०,००,०००**
कार्यालय खर्च	२,५०,०००	ढोबळ नफा	६,००,०००
विक्री खर्च	२,००,०००	(खाली आणला)	
वित्तीय खर्च	६०,०००		
शुद्ध नफा (स्थानांतरित)	९०,०००		
	६,००,०००		**६,००,०००**

कंपनीची चल संपत्ती आणि चल देयता खालील प्रमाणे होती :
ऋणको ₹ १,२०,०००, धनको ₹ ६०,०००, स्कंध ₹ ६०,०००, देय विपत्र ₹ ४०,०००, सुटे साहित्य ₹ २०,०००, अधिकोष अधिविकर्ष ₹ २०,०००.

खालील अनुपातांची गणना करा :

(१) सकल लाभ अनुपात

(२) परिचालन अनुपात

(३) शुद्ध लाभ अनुपात

(४) चल अनुपात

प्र. ६. समर्थ व्यायामशाळा, चंदगढ, प्राप्ती-शोधन खात्याचे व्यवहार पुढील प्रमाणे आहेत. त्या आधारे ३१ मार्च, २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न-खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा. **[१२]**

प्राप्ति-शोधन खाते

३१ मार्च, २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता

नावे **जमा**

प्राप्ति		रक्कम (₹)	शोधन	रक्कम (₹)
शिल्लक (पुढे आणली)			पगार	१८,०००
रोख		१५,०००	मनोरंजन खर्च	७,४४०
वर्गणी			विविध खर्च	३,९००
२०२१-२०२२	५४,०००		विद्युत शुल्क	३,६००
२०२२-२०२३	१,२३०	५५,२३०	भाडे	२,१००
देणगी		१८,०००	गुंतवणूक	४५,०००
मनोरंजनापासून प्राप्ती		१६,२००	छपाई व लेखन	
व्याज		१,२००	सामग्री	२,४००
प्रवेश शुल्क		१८,६००	टपाल खर्च	९,६००
			मुदत ठेव	११,७००
			शिल्लक	
			(पुढे नेली)	२०,४९०
		१,२४,२३०		**१,२४,२३०**

समायोजना :

(१) १ एप्रिल, २०२१ रोजीचा भांडवल निधी ₹ २,१०,०००

(२) १ एप्रिल, २०२१ ला संपत्ती पुढील प्रमाणे :
इमारत – ₹ १,५०,०००
उपस्कर – ₹ ४५,०००.

(३) इमारत आणि फर्निचरवर अनुक्रमे ५% आणि १०% दराने घसारा आकारा.

(४) ५०% प्रवेश फीचे भांडवलीकरण करा.

(५) संस्थेचे प्रत्येकी ₹ ५० वार्षिक वर्गणी देणारे १,५०० सभासद आहेत.

प्र. ७. स्नेहल आणि दिपाली भांडवलाच्या प्रमाणात नफा-तोटा विभागून घेणाऱ्या भागीदार आहेत. खालील परीक्षा सूची आणि समायोजनांच्या आधारे वार्षिक खाती तयार करा. **[१२]**

परीक्षा-सूची / तेरीज पत्रक
३१ मार्च, २०२१ रोजीचे

तपशील नावे	रक्कम (₹)	तपशील जमा	रक्कम (₹)
यंत्र व संयंत्र	२७,६००	भांडवल खाते :	
निर्गत वाहन व्यय	२,६००	स्नेहल	१,६०,०००
मजुरी व वेतन	१५,२००	दिपाली	८०,०००
विविध ऋणको	१,२४,०००	विविध धनको	६८,०००
सामान्य खर्च	५,०००	विक्री	२,९६,०००
स्कंध (१एप्रिल, २०२०)	१,७९,०००	संशयित कर्ज निधी	२,४००
मोटार गाडी	८०,०००	खरेदी परत	१२,०००
कार्यालय भाडे	१०,०००		
आत्मधृत संपत्ती	४६,०००		
विक्री परत	१६,०००		
जाहिरात (दोन वर्षांकरिता)	८,०००		
वेतन	९,०००		
खरेदी	९६,०००		
	६,१८,४००		**६,१८,४००**

समायोजना :

(१) संवरण स्कंध ₹ १,७६,०००

(२) अदत्त मजुरी ₹ १,६००

(३) ऋणकोवर ५% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधीची तरतूद करा.

(४) मोटार गाडीवर वार्षिक ५% आणि यंत्र सामग्रीवर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

तयार करा :

(अ) व्यापार खाते

(ब) नफा-तोटा खाते

(क) ३१ मार्च, २०२१चे ताळेबंद

◆◆◆